# ई-निविदांतर्गत खुली निविदा सुचना (पहिली वेळ)

## टेंडर बी – १ निविदा सुचना क्र. ०१

## ग्रामपंचायत येतगाव तालुका कडेगाव जिल्हा सांगली

सरपंच ग्रामपंचायत येतगाव तालुका कडेगाव जिल्हा सांगली हे जिल्हा परीषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन Percent Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने पुढील कामांच्या ई-निविदा मागविणेत येत आहेत.

| अनं | कामाचे नाव | निविदा रक्कम रूपये | इसारा रक्कम रूपये | टेंडर फी रक्कम रूपये | आवश्यक कंत्राटदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे येतगाव ता.कडेगाव जि.सांगली येथे आनंदा शिंगाडे घर ते भिकू गायकवाड घर ( तुकाराम नागू जरग ते विष्णू श्रीपती जरग घर ) पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ४२३१७७ /- | ४२३१/- | २००/- | सशिक्षित बेरोजागर अभियंता | ०६ महिने |

### निविदेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे

१.उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ.बाबत सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असुन निविदासंच **http://WWW.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक १८/०५/२०२६ सकाळी ०९:०० वाजलेपासुन ते दिनांक २५/०५/२०२६ १८:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड व अपलोड करता येतील.

२. उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पध्दतीने नेट बॅकिंग व्दारे वेबसाईट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्णतः यशस्वी झालेली पेमेंट स्लीप तांत्रिक लखोटयात अपलोड करता येतील .

३. निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे ग्रां.पं.मार्फत रस्त्याच्या डांबरीकरण करावयाच्या कामासाठी वापरणेत येणारे डांबर शासनाच्या अंगीकृत असलेल्या तेल रिफायनरीमधूनच खरेदी करून घ्यावे व खरेदी केलेल्या डांबराची मुळ चलने देयकासोबत जोडणे कंत्राटदारा वर बंधनकारक आहे. डांबरीकरण करावयाच्या कामासाठी वापरण्यात येणारे डांबराचे तेल कंपन्याकडील मुळ चलन कंपनीकडे खातरजमा करणेसाठी पाठविण्यात येईल त्याची खातरजमे नंतरच कामां वर वापरण्यास परवानगी देण्यात येईल. खातरजमा न केलेले डांबर कामासाठी वापरलेले आढळल्यास त्या कामाचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४.सन २०१७/१८ च्या दरसूचीन्वये यांत्रिकी पध्दतीने बनविलेली खडी या साहित्यावर रॉयल्टी स्वामित्वधन आकारण्या त येणार नाही तथापि दर पृथकरणामध्ये ती गेली असल्यास ती वजा करूनच घटीत दराने देयक अदा केले जाईल.

५. सन २०२०/२१ २०२१/२२ व २०२२/२३ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत दिनांक ३१/०३/२०२३ अखेर भौतिकदृष्ट्या पुर्ण नसल्यास योग्य कारणाशिवाय पुर्ण नसल्यास सदर मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल (उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा कं.१ अपलोड करणे अनिवार्य आहे)

ग्रामविकास अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत येतगाव ता.कडेगाव जि.सांगली

## प्रमाणपत्र

सदर निविदा सूचनामधील काम कं. हे मी भरलेले असून यापूर्वी सन २०२३/२४ , २०२४/२५ व २०२५/२६ जि.प.सांगली व ग्रामपंचायत येतगाव कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत भौतिक व आर्थिकदृष्टया पुर्ण केलेली आहेत. सन २०२३/२४ , २०२४/२५ व २०२५/२६ मधील काम माझेकडून दिनांक ३१/०३/२०२६ अखेर अपुर्ण असल्यास ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

समर्पक कारणासह योग्य त्या कागदपत्रासह स्पष्टता करावी

वर नमूद केलेली माहिती जर का चुकीची अथवा अपूर्ण कामाबाबत कारण समर्थनिय नसल्यास सदर निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल याची मला माहिती आहे.

(उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा कं.१ अपलोड करणे अनिवार्य आहे)

सही ----------------------------------
मक्तेदाराचे संपूर्ण नाव ----------------------------------------------
पूर्ण पत्ता ------------------------------------------------------
भ्रमणध्वनी कमांक ---------------------------------------------

# परीशिष्ट ०१

## ( र रू. १०० /- च्या स्टॅप पेपरवर )

मी ------------------------------------------------------------ वय वर्ष र. ता. जि.सांगली या करारपत्राद्वारे/सत्यप्रतिज्ञापत्रा द्वारे लिहुन देतो की. मी ---------------------------------------- या फर्मचा/कंपनीचा मालक/चेअरमन असुन नोटीस कमांक --------- ----- ----- ----मधील काम कमांक ------ ------ कामाचे नाव -------------------------------------------------------------------------- या कामासाठी निविदा सादर करीत आहे. या निविदेच्या लिफाफा क ०१ मध्ये मी सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी. बरोबर व पुर्ण आहेत.त्यामध्ये कोणत्याही त्रुटी/चुका नाहीत याची मी खात्री केलेली आहे.असे शपथपुर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे.या करार पत्रामध्ये निविदेसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही चुकीची. दिशाभूल करणारी .खोटी व तसेच अपुर्ण माहिती आढळल्यास भारतीय दंडसंहीता अंतर्गत मी/आम्ही कायदेशीर कारवाइस पात्र राहीन. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी/माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचारी यांनी जि.प.कार्यालयास कोणतीही खोटी माहिती किंर्वा देयकासोबत किंवा पत्रव्यवहारात खोटी/बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास मी भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन. जर कंत्राट कालावधीदरम्यान आणि काम सामाप्ती नंतर अंतिम देयक देण्याचे तारखेपर्यंत मी आम्ही सादर केलेली कोणतीही कागदपत्रे खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास मी/आम्ही भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहीस पात्र राहीन. जर काम समाप्तीनंतर किंवा कोणत्याही वेळी कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास मी/आम्ही भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन आणी माझी/आमची सांगली जिल्हा परीषद अंतर्गत झालेली नोंदणी कायमची रद्द करणेत येऊन मला आम्हाला काळया यादीत टाकणेत येईल याची मला/आम्हाला कल्पना आहे.

कंत्राटदाराची सही/शिक्का

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
ग्रामपंचायत येतगाव ता.कडेगाव जि.सांगली
ई निविदा सुचना २०२६/२७ NIT कमांक ०१

१.सदर संपूर्ण निविदा प्रकिया ई निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटिस प्रसिध्दी सूचना शुध्दीप्रत्रके इ माहिती बयाणा फी नेट बॅंकिंग द्वारा भरल्याची ऑनलाईन प्रत **http://WWW .mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाचे निविदा प्रपत्रे **http://WWW.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आली आहेत सदर निविदा प्रपत्रे अटी शर्ती इ सदर संकेत दिनांक दिनांक १८/०५/२०२६ सकाळी **०९:००** वाजलेपासुन ते दिनांक २५/०५/२०२६ **१८:००** वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येतील.

३.वरील कामाचे निविदा **http://WWW.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक दिनांक १८/०५/२०२६ सकाळी **०९:००** वाजलेपासुन ते दिनांक २५/०५/२०२६ **१८:००** वाजेपर्यंत ऑनलाई न पध्दतीने सादर करता येतील.

४. उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पध्दतीने नेट बॅंकिंगव्दारे वेबसाइट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे.तसेच पूर्णत: यशस्वी झालेली पेमेंट स्लीप तांत्रिक लखोटयात अपलोड करण्यात यावी.

५.संबंधित कंत्राटदाराने वरीलप्रमाणे तांत्रिक लिफाफा सोबत विहित नमुन्यातील प्रमाणप्रत्र अपलोड केल्यानंतर सदरील प्रमाणप्रत्राची मुळ प्रत कार्यालयास जमा करण्याची आवश्यकता असणार नाही.

६. कंत्राटदाराने निविदा खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर करणे आवश्यक आहे.

## अ) फी पात्रता तांत्रिक लिफाफा ०१

१.निविदा डाऊनलोड करणेसाठी निविदा फी व बयाणा रक्कम नेट बॅंकिंगव्दारे भरणा केलेली ऑनलाइन प्रत.

२.सुशिक्षित बेरोजगार अभियंता व खुला मक्तेदारांसाठी मक्तेदारांनी निविदा संच व १% इसारा (बयाणा) रक्कम ही मक्तेदारांनी स्वत: च्या बॅंक खातेमधून किंवा फर्म/सोसायटी/कंपनी यांच्या खात्यामधून ऑनलाई न पध्दतीने नेट बॅंकिंग व्दारे भरणा करणे बंधनकारक आहे व ती भरणा केल्याचे बॅंक स्टेंटमेंट बॅंकेचा खाते उतारा बॅंकेचे **RTGS/NEFT** संदर्भात चलनाची स्लीपची प्रत स्कॅन करून लफाफा नं ०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.

३. सांगली जिल्हयातील मजूर सहकारी सोसायटी यांची बॅंक खाती सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक सांगली येथे असून सदर बॅंकेमध्ये ऑनलाईन नेट बॅंकिंगची सुविधा नसल्याने मजूर सहकारी संस्थानी नेट बॅंक चलन **RTGS/NEFT** संदर्भात चलनाची स्लीपची प्रत स्कॅन करून लिफाफा नं.१ अपलोड करणे अनिवार्य आहे.

४. जि.प.सांगलीकडे नोंदणी केलेल्या वैध प्रमाणप्रत्राची स्कॅन केलेली प्रत

५. सन २०१७/१८ व २०१८/१९ जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत दिनांक ३१/०१/२०२० अखेर भौतिकदृष्टया पुर्ण नसल्यास ( योग्य कारणाशिवाय पुर्ण नसल्यास) सदर मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल . उपरोक्त प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा कं.१ अपलोड करणे अनिवार्य आहे

६.मिक्सर सेंट्रीगचे साहित्य व्हायब्रेटर रोलर इ आवश्यक सामुग्री असलेबाबतचे मालकीचे अथवा भाडेतत्वावर घेणार असल्यास ते ज्यांच्याकडून घेणार आहेत त्याबाबतचे करार व पुराव्याची स्कॅन केलेली प्रत (निविदा रक्कम रूपये ३०.०० लक्ष वरील कामांना लागू)

७. मागील ३ वर्षात पूर्ण केलेल्या कामांचे (**Work Done Certificate** )संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता उपअभियंता यांचे स्वाक्षरीचे प्रमाणप्रत्राची स्कॅन केलेली प्रत (निविदा रक्कम रूपये ३०.०० लक्ष वरील कामांना लागू)

८.उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाची माहिती.( निविदा रक्कम रूपये ३०.०० लक्ष वरील कामांना लागू)

९.सन २०१८/१९ असेसमेंट ईअ प्राप्तीकर भरणा केल्याचे प्रमाणप्रत्र सुबेअ व मजूर सहकारी सोसायटी यांच्या साठी प्राप्तीकर नसल्यास पॅनकार्डची स्कॅन केलेली प्रत

१०.भागीदारी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत अथवा नोटरी केलेली भागीदारी प्रमाणपत्र. भागीदारी असल्यास

११.डांबरीकरणाच्या कामासाठी स्वताच्या मालकीच्या अथवा करारपत्रावर घेणेत आलेल्या हॉटमिक्स प्लॅण्ट पेवर फिनिशर रोलर ही मशिनरी असल्याचा कागदोपत्री परावा सादर करावा लागेल व सदर प्लॅण्ट १० वर्ष पुर्ण झाली असल्यास वैध असल्याचे सक्षम प्राधिकारयाचे प्रमाणपत्र (**MOST**) आवश्यक आहे व १० वर्षे पुर्ण झाली नसल्यास प्लॅट खरेदीचा कागदपत्रे तसेच प्लॅण्ट चालू असलेबाबत स्वसाक्षांकीत घोषणापत्र ई निविदा सोबत अपलोड करणे अनिवार्य असुन हॉटमिक्स प्लॅण्ट भाडयाने घेतले असल्याचे छायांकीत प्रत करारनामा नोटराईज निविदे सोबत जोडण्यात यावा.

१२.एकाचे निविदेमध्ये मूळ प्लॅण्ट धारक व त्यांनी दिलेला भाडेपट्टा दिलेला भाडेपट्टा धारक यांनी निविदा भरलेली आढळुन आलेस दोन्ही निविदाधारक यांना अपात्र करणेत येईल.तसेच दोन्ही निविदा धारकांची निविदा रकमेच्या १ बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

१३.निविदा सुचना मधील ईतर आवश्यक बाबी.

१४.मक्तेदारांस देयके अदा करताना जी.एस.टी असल्याशिवाय देयके अदा करता येणार नसल्याने निविदा भरणारे सर्व मक्तेरारांकडे **GST** असणे आवश्यक आहे.निविदा भरण्याचे दिनांकापुर्वी संबंधित विभागाकडे **GST** साठी मागणी केली असल्यास संबंधीत विभागाची पोहोच दर्शविणारया पत्राची प्रत निविदोसोबत जोडावी **GSTIN** साठी मागणी केली असल्यास संबंधीत विभागाची पोहोच दर्शविणारे पत्राची प्रत निविदेसोबत सादर केल्यास सदर मक्तेदारांना पात्र केले जाईल.परंतु प्रथम देयका वेळी किंवा पहले व अंतिम देयकावेळी **GSTIN** नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध केले शिवाय देयक अदा केले जाणार नाही.म्हणजेच **GSTIN** असणारे किंवा मागणी केलेल्या मक्तेदारांनाच पात्र केले जाईल.

१५ .रू ३०.०० लाखां खालील सर्व कामांना काम पुर्ण केलेचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य नाही.सर्व मक्तेदार वर्ग

१६ .रू ३०.०० लाखां वरील सर्व कामांच्या निविदा साठी लगतच्या तीन वार्यमध्ये निविदा रकमेच्या कमीत कमी ५० इतक्या रकमेचे त्याच प्रकारचे काम केले बाबत कागदपत्रे स्कॅन करून सादर करणे बंधनकारक आहे.

१७.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सांगली यांचेकडील पत्र जाक अति मुकाअ/पीए/५६१/२०२० दिनांक २८/१२/२०२० व मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सांगली यांचेकडील पत्र जाक अति मुकाअ/पीए/२०२१ दिनांक ०९/०२/२०२१ नुसार मजूर सहकारी संस्थांकडील सर्व मजुरांचे नोंदवहीची प्रत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे सही शिकयाने अपलोड करणे अनिवार्य आहे.

१८.मजूर सहकारी संस्था यांनी मजूरांच्या खात्यामध्ये परिश्रमीक मुल्य/रोजंदारीची रककम जमा करणे आवश्यक आहे कामावर प्रत्यक्षात तेच मजूर उपस्थित राहतील याची दक्षता घेऊन मजूरांना ओळखपत्रे देणे आवश्यक आहे.

१९.मजूर सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अंतर्गत सर्व नियम व अटी यांचे पालन करणे आवश्यक आहे.

## ब आर्थिक लिफाफा लिफाफा क्रमांक ०२

१.कंत्राटदारांनी आपले दर **BOQ** मध्ये योग्य त्या जागी करून सदरची **BOQ** लिफाफा क्रमांक ०२ मध्ये अपलोड करावी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या निविदेचे दर ईतर कोठेही नमुद करणेत येऊ नयेत. २.स्थायी समिती जि.प.कडील सभा दिनांक ०२/११/२०१८ ठराव क्रमांक २३१ अन्वये मक्ता मंजुरीनंतर १५ दिवसांत स्टॅम्प पेपर देऊन व अनामत भरून कार्यारंभ आदेश घेणे बंधनकारक आहे.तसे न केलेस **L १** निम्नस्तर असुन सुध्दा त्या मक्तदारांस त्या निविदेचा हक्क राहणार नाही.सदर मक्तेदाराची **EMD** जप्त करून त्या मक्तेदाराची नोंदणी ३ महिन्यांसाठी निलंबीत केली जाईल.दतनंतर सदरचे काम तात्काळ **L2** ला जर ळ१ च्या दराने करावयास तयार असेल तर तात्काळ स्टॅम्प पेपर व अनामत भरणेस तयार असेल त्यास देणेत येईल.अन्यथा दुबार फेर ई निविदा प्रकिया राबविणेत येईल.

३.मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे कडील परीपत्रक क विकास/कार्यासन-५/कावि/११३९/ २०१८ दिनांक ०५/०९/२०१८ अन्वये मक्तदार जर का मुदतीत काम पुर्ण न केलेस सदर परीपत्रकात नमुद केले प्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल .सोबत सदर परीपत्रकाची प्रत अपलोड केली आहे. शासन निर्णय क सीएटी/२०१७/प्रक-०८/इमा-२ मंत्रलय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ अन्वये बाब क ४६ अन्वये निविदा १ ते १० कमी दरासाठी १ % परफॉर्मन्स सिक्यरीटी म्हणुन धनाकर्ष सादर करावा.१० पेक्षा जास्त दराने आहे तेव्हढया रकमेचा बाब क ४.६.२ प्रमाणे डी डी.सादर करावा. उदा. १४ कमी दर --- १० % करीता १ % व १४ % - १० % = ४ % असे एकुण ५ % ही रक्कम रू १००० पेक्षा कमी असल्यास किमान रू १००० चा डी.डी. सादर करणे अनिवार्य आहे.

| अक | कमी भरलेली टक्केवारी | रस्त्याचे काम | | ईमारत व ईतर कामे | |
|---|---|---|---|---|---|
| | | दोष दायित्व कालावधी | अतिरीक्त सुरक्षा ठेव अनामत | दोष दायित्व कालावधी | अतिरीक्त सुरक्षा ठेव अनामत |
| १ | १ % ते १० % | २ वर्षे | १ % | २ वर्षे | १ % |
| २ | ११ % | ३ वर्षे | २ % | ४ वर्षे | २ % |
| ३ | १२ % | | ३ % | | ३ % |
| ४ | १३ % | | ४ % | | ४ % |
| ५ | १४ % | | ५ % | | ५ % |
| ६ | १५ % | | ६ % | | ६ % |
| ७ | १६ % | ४ वर्षे | ७ % | ६ वर्षे | ७ % |
| ८ | १७ % | | ८ % | | ८ % |
| ९ | १८ % | | ९ % | | ९ % |
| १० | १९ % | | १० % | | १० % |
| ११ | २० % | | ११ % | | ११ % |
| १२ | २१% व त्यापुढे | ५ वर्षे | १२ % | ८ वर्षे | १२ % |

बाब क ४.६.५ अन्वये खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचना आहेत.

शासन परीपत्रक क सीएटी /२०१७ प्रक.०८इमा - २ दिनांक २६/११/२०१८ अन्वये अतिरीक्त सुरक्षा ठेव अनामत निविदा लिफाफा क २ मध्ये अपलोड करण्याच्या सुचना रद्द करणेत येत असुन लिफाफा क १ व क २ उघडलेनंतर प्रथम निम्नतम देकार सादर करणारे L1 निविदाकाराने आठ दिवसाच्या आत सरपंच ग्रामपंचायत येतगाव यांचे कार्यालयात जमा करावा.ही ८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम असणार नाही.

अ . डी डी सरपंच ग्रामपंचायत येतगाव यांचे नावे असावा

ब.डी डी सरकारी शेडयुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बॅकेचा असावा.

क.लिफाफयावर कामाचे नाव निविदा सुचना कमांक व काम कमांक तसेच कंत्राटदाराचे नाव व भ्रमणध्वनी कमांक नमुद करावा तसेच सदरील बाब डीडी च्या मागे सुध्दा लिहावी.

ड.निविदा उघडलेवर लिफाफा क १ मधील कागदपत्रांची पर्तता न झालेस संबंधीत कंत्राटदारांना त्यांचा डीडी ग्रामविकास अधिकारी यांनी ७ दिवसांत परत करतील.

ई.लिफाफा क ०१ मधील कागदपत्रांची पुर्तता होऊन ज्या कंत्राटदारांचे लिफाफा क ०२ मधील देकार उघडणेत येतील त्यामधील निम्नतर २ निविदा धारकांचे प्रतिभूती हमी लिफाफ डी डी वगळता इतर कंत्राटदारांचे बॅकेची प्रतीभुती हमी लिफाफा ३ दिवसांत परत देणेत यावेत.

फ.निम्नतर निविदाधारकांना कार्यारंभ आदेश देणेत आले नंतर ३ दिवसांत क चे निम्नतर निविदाधारकाची बॅकेची प्रतिभूती हमी डी डी परत देणेत यावी.

भ.वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे बॅक प्रतिभूती हमी सादर करणारे कंत्राटदारांची अनामत रक्कम **EMD** जप्त करणेत यावी व संबंधीत कंत्रत्राटदारास काळया यादीत टाकणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.सांगली यांना शिफारस करणेत येईल.तसेच असा काळया यादीतील कंत्राटदारांच्या निविदा उघडणेत येणार नाहीत.

उपरोक्त शासन निर्णयातील बाब क ५.५ यंत्रसामग्री बाबत खालील प्रमाणे.

१.यंत्रसामग्रीसाठी स्वताचे मालकीच्या जागेची अट टाकणेत येऊ नये.

२.कामासाठी नवीन यंत्रसामग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत धरण्यात यावे.

३.पहिल्या १० वर्षासांठी अधिक्षक अभियंता यांत्रीकी यांच्या यांच्या योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

४.१० वर्षानंतर प्रतिवर्षी अधिक्षक अभियंता यांत्रीकी यांचे योग्यता प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

५.र रू १.५० कोटी रकमेच्या कामांसाठी तसेच सशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कामांसाठी **HOT MIX Plant/Batch MIX Plant Machinery** यांच्या मालकी हक्काबाबत अट निविदेमध्ये समाविष्ट करणेत येऊ नये.यासाठी स्वसाक्षांकीत भाडे प्रमाणपत्राची अट टाकणेत यावी. निंम्नतर निविदाधारकाकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्या नंतर कार्यारंभ आदेश देणेत येईल.

क निविदा सादर करणे.

१.उपरोक्त पणे नमुद दोन लिफाफा पध्दतीने निविदा ऑनलाईन पध्दतीने अपलोड करून सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अर्मतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील.कंत्राटदारांनी विहीत वेळेपुर्वी त्यांची निविदा अपलोड करण्याची दक्षता घ्यावी.

२.कंत्राटदारांनी कामाचे नकाशे निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय **Specification** कामाचे स्थळ मजुर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबींचा विचार करून निविदा सादर कराव्यात.

३.ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क ०१ तांत्रिका लिफाफा सर्व कामे दि. **27/05/2026** रोजी सकाळी ०९ वाजलेनंतर **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर सरपंच ग्रामपंचायत येतगाव ता.कडेगाव जि.सांगली यांचे कार्यालयात ऊघडणेत येतील.

४.लिफाफा क ०१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करून सदरचे छाननीमध्ये पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या दराचा लिफाफा क ०२ ऊघडणेत येईल.

५.कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा निविदेमधील दर लफाफा क ०२ ऊघडलेनंतर ९० दिवसांपर्यंत वैध राहतील.

६.मंजुर निविदा धारकांकडून कामाचा करारनामा करतेवेळी खुला मक्तेदार वर्ग साठी निविदा रकमेच्या १.५ % इतकी रक्कम सुरक्षा ठेव अनामत व सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि मजूर सहकारी संस्थांना रकमेच्या २.५ % इतकी सुरक्षा ठेव अनामत म्हणुन घेतली जाईल.व उर्वरीत २.५ % अनामत रक्कम प्रथम धावते देयकामधून कपात केली जाईल. मजुर सोसायटी कंत्राटदाराने सुरक्षा अनामत रक्कम ७ दिवसांत भरणा करून विहीत नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक आहे.कंत्राटदारांनी करारनामा

करून न दिल्यास सदरचे कंत्राटदाराचे बयाणा रक्काम जप्त करून कंत्राटदारास काळया यादीत टाकणेत येईल.

८.निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना शुध्दीपत्रके अथवा इतर सर्व माहीती **https://www.mahatend ers.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.ती वेळोवेळी तपासणे व निविदेमध्ये योग्य ते बदल करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे.

९.शासन परीपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क प्रक्र-४० जल/३ दिनांक १९/१०/२००१ अन्वये मक्तेदारांकडून वसुल केलेली ५ % इतकी अनामत रक्कम **Defect Laibility Period** साठी राखुन ठेवणेत येईल.सदरची अनामत रक्कम **Defect Laibility Period** संपल्यानंतरच ठेकेदारास परत करण्यात येईल.

१०.निविदेमधील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पुर्ण न करणारे कंत्राटरटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजणेत येतील.

११.कोणतेही अटीवर आधारीत निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.अथवा स्विकारल्या तरी मंजुर केल्या जणार नाहीत.

१२.निविदेबाबत शुध्दीपत्रक काढणेची गरज भासल्यास ती **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१३.ई निविदेच्या अटी व शर्ती बदल करणे प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षांकीत यांनी राखुन ठेवला आहे.तसेच एखादया कामाची निकड लक्षात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथील करणेचा हक्क निम्न स्वाक्षांकीत यांनी राखुन ठेवला आहे.

१४.संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा तंत्राचा एक भाग राहील.

१५.कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही. १६.अन्य जिल्हा परीषदेकडे नोंदणी सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजुर सहकारी संस्था यांना सांगली जिल्हा परीषद अंतर्गत वा ग्रांपं मार्फत प्रसिध्द केलेल्या निविदोमध्ये सहभाग घेता येणार नाही.

१७.निम्नस्तर **L1** निविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करणेत येई ल. एखादा मक्तेदार निम्नस्तर निविदा भरून जर काम करणेस किंवा सुरक्षा ठेव अनामत भरणेस वारंवार नकार देत असेल त्याचेवर निविदा भरणेस प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेत येईल. .निम्नस्तर **L1** निविदा धारक काम करणेस तयार नसेल तर द्वितीय निम्नस्तर त निविदा धारकास प्रथम निम्नस्तर **L1** दराने काम करणेस तयार असलेची विचारणा करून तयार असल्यास त्याला ती निविदा बहाल करण्यात येईल.

सही :-

ग्रामविकास अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत येतगाव ता.कडेगाव जि.सांगली

Signature Not Verified
Digitally signed by JAYSHRI SUBHASH KANASE
Date: 2026.05.17 21:59:19 IST
Location: Maharashtra-MH